| | |
|---|---|
| **MHND060013292022** | दाखल दिनांक :– १७/१०/२०२२<br>नोंदणी दिनांक: – १७/१०/२०२२<br>निकाल दिनांक:– २१ / ११ /२०२३<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०१ ०१ ०४ |

न्यायदंदाधिकारी प्रथमवर्ग बिलोली, न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी – एस.जी. ठाणेदार)

–: न्यायनिर्णय :–

(घोषित दिनांक २१ / ११ /२०२३)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१९/२०२२ निशाणी क्र. २३

गु.र.नं. ५४/२०२२ पो.ठाणे. रामतिर्थ

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे– कुंडलवाडी. |
| प्रतिनिधीत्व | श्री. एस.डी. हाके |
| आरोपीं | शिवराज गंगाधर दर्शनवाड ,वय– ३० वर्षे , धंदा– मजुरी,<br>रा. पिंपळगाव कु., ता.बिलोली,जि.नांदेड |
| प्रतिनिधीत्व | श्री. के.जी. देशमुख |

भाग– ब

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २८/०५/२०२२ |
| पहिली खबर दिनांक | २८/०५/२०२२ |
| दोषारोपपत्रचा दिनांक | १७/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १८/१०/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २७/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | २१/११/२०२३ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २१/११/२०२३ |
| शिक्षा दिल्याची तारीख , आदेश | निर्दोष मुक्त. |

आरोपीचा तपशील

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | दोषारोप / गुन्हा | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ फौज. प्र. सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | शिवराज गंगाधर दर्शनवाड | २५/०२/२०२१ | २५/०२/२०२१ | ६५ ई | निर्दोष मुक्त | -- | -- |

भाग – क

अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | लक्ष्मण शिवाज जायेवार | घटनास्थळ पंच व जप्ती पंच |
| अ.सा.क्र.२ | शेख नजीर मदार | फिर्यादी |
| अ.सा.क्र.३ | टी.एम. बेग | तपासीक अमंलदार |

ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार, जर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

अभियोगपक्षाचे /बचाव /न्यायालयीन निशाणी

अ. अभियोग पक्ष

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.अभियोग पक्ष–०९/सा.क्र.२–– | फिर्याद |
| २ | नि.अभियोग पक्ष–१०/सा.क्र.२–– | प्रथम खबरी अहवाल |
| ३ | नि.अभियोग पक्ष–१३/सा.क्र.३–– | जप्ती पंचनामा |
| ४ | नि.अभियोग पक्ष–१४/सा.क्र.३–– | मुद्देमाल पावती |
| ५ | नि.अभियोग पक्ष–१५/सा.क्र.३–– | घटनास्थळ पंचनामा |
| ६ | नि.अभियोग पक्ष–१६/सा.क्र.३–– | सी.ए. साठीचे पत्र |
| ७ | नि.अभियोग पक्ष–१७/सा.क्र.३–– | सी.ए. अहवाल |

बचाव पक्षाने मान्य केलेले कागदपत्रे

| अनु.क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

ब. बचाव पक्ष नि.क्र. यादी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.ब. पक्ष–/सा.क्र.१ | निरंक |

क. न्यायालय नि.क्र. यादी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.न्या.–––/सा.क्र.१ | निरंक |

ड. मुद्देमाल / वस्तु

| अनु.क्र. | मुद्देमाल / वस्तु क्र. | तपशील / वर्णन |
|---|---|---|
| १ | वस्तु क्र. ( एम.आर. नं. १८/२०२२ ) | १८० मि.ली. क्षमतेच्या देशी दारु भिंगरी च्या १२ बाटल्या |

## न्या य नि र्ण य

**(आज तारीख २१ नोव्हेंबर , २०२३ रोजी पारीत.)**

आरोपीवर तपासी अधिकारी यांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५(ई) नुसार मादक द्रव्य अधिनियमाच्या तरतुदी अगर परवान्याचे उल्लंघन करून बाळगल्याचा आरोप ठेवला आहे.

**अभिकथित गुन्ह्याची पार्श्वभूमि येणे प्रमाणे**

२. तारीख २८/०५/२०२२ रोजी, फिर्यादी शेख नजीर मदार (पोकॉ/२८६९ पो.स्टे. कुंडलवाडी) गस्तीवर असताना त्यांना एक बातमीदाराकडून गुप्त बातमी मिळाली की, आरोपी मौजे पिंपळगाव त्याच्या राहत्या घरासमोर रोडच्या बाजुस

देशी दारु भिंगरीच्या बॉटल्स विक्रि करीत आहे. मिळालेल्या गुप्त खबरीवरून त्यांनी साक्षीदार व पंचांना घेवून पिंपळगाव येथे गेलो असता, आरोपी एका नायलोन पिशवीत १८० मिली क्षमतेच्या एकुण १२ बॉटल्स देशी दारु भिंगरी संत्रा अंदाजे किंमत रु.८४०/– विक्रि करीत असल्याचे आढळुन आली. हे मादक द्रव्य बाळगण्याचा परवाना आरोपीकडे नव्हता. पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून त्यातील १८० मि.ली. नमुना रासायनिक विश्लेषणासाठी राखुन ठेवला होता. त्यानंतर आरोपीने अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करीत मादक द्रव्य जवळ बाळगल्याबाबत फिर्यादी शेख नजीर मदार यांनी आरोपीविरूध्द खबर दिली.

३. खबरीच्या आधारे पोलीस स्टेशन कुंडलवाडी अपराध क्रमांक ५४/२०२२ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी प्रकरणातील आरोपीस अटक करून प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करित आरोपीविरूध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

४. मी **(नि.क्र. ०६)** अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवलेला आहे. आरोपीला गुन्ह्याचे स्वरूप वाचून व समजावून सांगितले असता त्याने गुन्हा केल्याचे नाकारले व खटल्याची सुनावणीची मागणी केली. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन **(नि.क्र. २२)** नोंदविण्यात आले.

५. त्यांनतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यात मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस डी हाके व बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ आणि श्री के जी देशमुख यांचा

युक्तीवाद ऐकला.

**६.** या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उद्भवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमिमांसांच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्यांचे आधारे, आजरोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहे.

| **अनु क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | तारीख २८/०५/२०२२ मौजे पिंपळगाव, ता. बिलोली येथे आरोपीच्या कब्जात देशी दारु भिंगरीच्या १२ बाटल्या, हे मादक द्रव्य अधिनियमांच्या तरतुदी अगर परवान्याचे उल्लंघन करून सापडल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही** |
| २. | काय आदेश ? | आरोपी निर्दोष मुक्त |

## कारणमिमांसा

**७.** अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द दोषारोपीत करण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ लक्ष्मण जायेवार **(निशाणी ०७),** साक्षीदार क्र.२ शेख नजीर मदार फिर्यादी **(निशाणी ०८)** व साक्षीदार क्र.३ टी.एम. बेग **(निशाणी १२)** वर तपासले. आरोपीने त्याचे बाजूने कोणतेही साक्षीदार तपासलेले नाही.

**मुद्दा प्रश्न क्र. १ व २ च्या अनुषंगाने –**

**८.** या संपरिक्षेतील आरोपी विरूध्दचा गुन्हा पुर्ण साबित करण्यासाठी अभियोग

पक्षाच्या खांद्यावर काही घटक प्रस्थापित करण्याची जबाबदारी होती. अर्थातच हे घटक सिध्द करताना अभियोग पक्षाने करावी निःसंशय, सुसुत्रतापुर्ण आणि स्वयंस्पष्ट अशा विश्वासार्ह पुराव्याचे सादरीकरण आवश्यक होते. आपल्या उपरोक्त गुणवेशिष्टांच्या पुराव्यातून अभियोग पक्षाने हे सादर करणे आवश्यक होते की, आरोपीच्या कब्जात मादक द्रव्य अगर तत्सम गुणधर्म असलेले पदार्थ सापडले होते. अर्थातच हे शाबित करणे नितांत आवश्यक होते की, ते सापडलेले पदार्थ व द्रव्य मादक म्हणुन गणले जातात. त्याचप्रमाणे आरोपीकडे असे पदार्थ बाळगण्याचा परवाना नव्हता. अगर परवाना असल्यास आरोपीने त्याचे उल्लंघन केले होते. हे देखील अभियोग पक्षाच्या सिध्दतेतील आवश्यक घटक होता.

९. या उपरोक्त घटकापैकी आरोपीच्या कब्जातून मादक पदार्थ वा द्रव्य मिळाले व जप्त झाले हे प्रस्थापित करण्यासाठी अभियोग पक्षाने आपले पंच साक्षीदार पुराव्यासाठी तपासले परंतु अभियोग पक्षास त्यांनी साथ दिली नाही. सदर प्रकरणातील फिर्यादी हे पोलीस कर्मचारी आहेत. फिर्यादीने त्याच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, छापा टाकल्याची वेळ फिर्यादित नमुद नाही व तसेच ज्या खाजगी वाहणाने छापा टाकला होता त्याचे नंबर फिर्यादित नमुद नाही. व तसेच फिर्यादीने असेही मान्य केले आहे की, त्याच्या फिर्यादीत मुददेमाल संदर्भात तपशील नमुद नाही. फिर्यादीने असेही मान्य केले आहे की, घटनास्थळ हे वरदळीचे ठिकाण आहे. जप्ती पंचाला तपासण्यात आले परंतु त्यांनी अभियोग पक्षास साथ दिली नाही. अभियोग पक्षाने तपासीक अमलदारास तपासले आहे. तपासीक अमलदार यांनी त्यांच्या उलट तपासत मान्य केले आहे की, जप्ती पंचनाम्यानंतर

घटनास्थळ पंचनामा तयार केला होता व तसेच जप्त मुददेमालचा बॅच क्र. इत्यादी तपशील जप्ती पंचनाम्यामध्ये नमुद नाही. **महत्तवाचे म्हणजे तपासीक अमलदाराने त्याच्या उलट तपासात असे मान्य केले आहे की, नमुना तपासणीसाठी पाठविण्यात १६ दिवसाचा विलंब झालेला आहे**. अभियोग पक्षाने या शिवाय व इतर स्वतंत्र् साक्षीदारांना तपासण्यात आले नाही. वरील सर्व बाबी लक्षात घेता अभियोग पक्षाचे कथन संशयास्पद वाटते. आरोपी विरुध्द कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

**१०.** अभियोग पक्षाचे इतर साक्षीदाराना वेळोवेळी समन्स, जमानती वारंट व विनाजमानती वारंट सुध्दा काढण्यात आले परंतु, अभियोग पक्षाचे साक्ष देण्यासाठी न्यायालयासमक्ष हजर झाले नाही. अभियोग पक्षाला, पुरेशी संधी देवून ही उर्वरित साक्षीदार तपासले नाही म्हणुन दि. ०५.०७.२०२३ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**११.** अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीचे ताब्यातून सार्वजनिक जागी देशी दारु भिंगरी जप्त करण्यात आली. जप्त दारूपैकी एका बाटलीत नमुना म्हणुन काढून रासायनिक तपासणीसाठी प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नांदेड येथे पाठविण्यात आले होते. त्याबाबत रासायनिक पृथक्करण अहवाल अभिलेखावर दाखल आहे .

**१२.** अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीच्या ताब्यातून मौका जप्ती पंचनाम्याप्रमाणे देशी दारु जप्त करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणात रासायनिक अहवाल दाखल आहे. सदर

प्रकरणात जप्त नमुना कोणाकडून व कसा जप्त करण्यात आला, तसेच जप्त करताना त्यावर सील लावण्यात आले किंवा नाही. याबाबत स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आढळून येत नाही. जप्त नमुना ज्या कर्मचाऱ्याने प्रयोगशाळा येथे विश्लेषणकामी नेला त्याचा पुरावा अभियोग पक्षांनी नोंदविला नाही. त्यामुळे जप्त नमुना सोबत कोणतीही छेडछाड झाली होती किंवा नाही, किंवा त्यावर सील होते किंवा नाही, हे स्पष्ट करणारा पुरावा अभियोग पक्षाने सादर केला नाही. वरील सांगीतल्याप्रमाणे नमुना तपासणीसाठी पाठविण्यात १६ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदर कालावधीत मुददेमाल कोठे व कसा ठेवला होता त्याचे काय स्पष्टीकरण अभियोग पक्षाकडुन देण्यात आलेले नाही. सदर विलंबाचे कारणही अभियोग पक्षाने सांगितलेले नाही. म्हणुन मुददेमालला छेडछाड किंवा मुददेमाल मध्ये नैसर्गिक बदल व खरब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व कारणामुळे आरोपी विरूध्द ठेवलेला आरोप संशयातीत शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळविण्यास पात्र आहे.

**१३.** फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जावून गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. खटल्यात अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा समंजस संशयाच्या पलीकडे जावून सिध्द केला नाही. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून असे स्पष्टपणे दिसून येते की, महाराष्ट्र दारूबंदीचे कलम ६५(ई) ला लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावून आरोपीविरूध्द सिध्द केले नाही. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ ला नाही असे उत्तर देत आहे व मुद्दा क्रमांक २ संदर्भात, वरील

सर्व विवेचन लक्षात घेता मी, खालील आदेश पारीत करित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी शिवराज गंगाधर दर्शनवार यास फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) खालील गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात यावे. |
| ३. | जप्त मुद्देमाल देशी दारु भिंगरीच्या १२ बॉटल्या अपील कालावधीनंतर दूय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बिलोली यांच्या कार्यालयाकडे योग्य विल्हेवाटसाठी पाठविण्यात यावा. |
| ४. | आरोपींने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) नुसार १५,०००/- रूपयांचे वैयक्तिक व जामीन बंधपत्र द्यावे, जे सहा महिन्यासाठी अंमलात राहील. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला ) |

SHAHABUDDIN GHOUSEMOHIUDDIN THANEDAR
Digitally signed by SHAHABUDDIN GHOUSEMOHIUDDIN THANEDAR
Date: 2023.11.22 11:04:15 +0530

दिनांक- २१/११/२०२३.
ठिकाण- बिलोली

**(एस.जी.ठाणेदार )**
न्यायदंडाधिकारी,प्रथमवर्ग
न्यायालय क्र.०२, बिलोली.

# ***CERTIFICATE***

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr.Clerk | : | P. A. Pawar... |
| Court Name | : | Judicial Magistrate F.C., Biloli. |
| Date | : | 21. 11. 2023. |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 21. 11. 2023. |
| Judgment uploaded on | : | 21. 11. 2023. |